# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१**

क्र.सहा.आ/ए/ ०१०८६ /ओडी/परिरक्षण, दिनांक: १६ / ०९ /२०२६

## स्थळ दरपत्रिका सुचना

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र राज्य श्री. राहुल नार्वेकर यांनी दिनांक ११.०९.२०२६ रोजी 'ए' विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, गीता नगर व गणेश मूर्तीनगर येथे गणेशोत्सवाच्या कालावधीत गणेश मूर्तीचे विसर्जन करण्याकरीता वाहनावर स्थित विसर्जन तळ उपलब्ध करून देण्याचे आदेश या विभागास देण्यात आले आहेत. सदर आदेशानुसार नागरिकांच्या सुविधेकरिता व गणेशमूर्ती विसर्जनाची व्यवस्था सुरळीतपणे होण्यासाठी या विभागामार्फत आवश्यक वाहनावरील विसर्जन तळ उपलब्ध करून देण्याकरिता अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सबब, 'ए' विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, गीता नगर व गणेश मूर्तीनगर येथे गणेशोत्सवाच्या कालावधीत गणेश मूर्तीचे विसर्जन करण्याकरीता वाहनावर स्थित विसर्जन तळ सदर कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदारांकडून स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे ठिकाण व स्वरुप | अंदाजित रक्कम (जीएसटी सहित) |
|---|---|---|
| १ | 'ए' विभागातील बीट क्र. २२६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे गणेशमूर्ती विसर्जनासाठी वाहनावरील विसर्जन तळ उपलब्ध करून देणे, फुलांची सजावट करणे, फ्लेक्स/बॅनर्स लावणे तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. | २,९९,७४२.४२ |
| २ | 'ए' विभागातील बीट क्र. २२६, गणेश मूर्तीनगर येथे गणेशमूर्ती विसर्जनासाठी वाहनावरील विसर्जन तळ उपलब्ध करून देणे, फुलांची सजावट करणे, फ्लेक्स/बॅनर्स लावणे तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. | २,९९,७४२.४२ |
| ३ | 'ए' विभागातील बीट क्र. २२७, गीता नगर येथे गणेशमूर्ती विसर्जनासाठी वाहनावरील विसर्जन तळ उपलब्ध करून देणे, फुलांची सजावट करणे, फ्लेक्स/बॅनर्स लावणे तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. | २,९९,७४२.४२ |

पात्रता व निकष :

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.

२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ या ठिकाणी स्थळदरपत्रिका भरण्याची कालावधी (दिनांक १६.०९.२०२६ – दुपारी ०१:०० ते दिनांक १७.०९.२०२६ – दुपारी ०१:०० पर्यंत व त्याच दिवशी दिनांक १७.०९.२०२६ रोजी दुपारी ० २:०० वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येईल.)

**सही/-**

**कार्यकारी अभियंता 'ए' विभाग**